पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०३

**सभावृत्तांत**

**दिनांक -** १६**/१२/२०२१** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माशिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **१६/१२/२०२१** रोजी दुपारी २**.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. राजापुरे माधवी राजेंद्र - सभापती**
२. मा. पवार मनिषा प्रमोद
३. मा. बारसे प्रियांका प्रविण
४. मा. सारीका शिवाजी सस्ते
५. मा. वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा. संदिप खोत - उप आयुक्त, मा.रोहीणी शिंदे - प्रशासन अधिकारी (२) अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेत नवीन फर्निचर खरेदी करणेबाबत...

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इ. १ ली ते इ. १० वी तील विद्यार्थांना नकाशावही, व्यवसायमाला व प्रयोगवही खरेदी करणेबाबत....

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ. ५ वी आणि इ. ८ वी तील विद्यार्थांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी महाराष्ट्र शासनाच्या बालभारती मार्फत “शिष्यवृत्ती मार्गदर्शिका” पुस्तके खरेदी करणेबाबत...

----------

खालील प्रमाणे सुचना मांडण्यात आली

सुचक - मा.मनिषा पवार　　　　　　　　　　　अनुमोदक - मा.सारीका सस्ते

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.शिक्षण समिती(कार्यपत्रिका क्र.०३ ) गुरुवार दिनांक १६/१२/२०२१ रोजीची पाक्षिक सभा दि.२०/१२/२०२१ रोजी दु.२.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

----------

सभापती - दि.२०/१२/२०२१ रोजी दु.२.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( राजापुरे माधवी राजेंद्र )**
**सभापती**
**मा.शिक्षण समिती**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०३

**सभावृत्तांत**

**दिनांक - २०/१२/२०२१** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माशिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **२०/१२/२०२१** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा. राजापुरे माधवी राजेंद्र - सभापती**
२. मा. पवार मनिषा प्रमोद
३. मा. बारसे प्रियांका प्रविण
४. मा. सारीका शिवाजी सस्ते
५. मा. भाऊसाहेब सोपानराव भोईर
६. मा. संजय मल्हारराव वाबळे
७. मा. वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा. संदिप खोत - उप उप.आयुक्त, मा.स्मिता गौड - प्रशासन अधिकारी (१), मा.रोहीणी शिंदे - प्रशासन अधिकारी (२),- पराग मुंडे - सहा.प्रशासन अधिकारी मा.रजिया खान - पर्यवेक्षिका, मा.अनिता जोशी - पर्यवेक्षिका सभेस उपस्थित होते.

----------

१) दिनांक ०२/१२/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०२) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - ०४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २०/१२/२०२१ विभाग - शिक्षण
सुचक - मा.मनिषा पवार अनुमोदक - मा.सारीका सस्ते
संदर्भ - मा. मनिषा पवार व मा. सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये अनेक वर्षांपासून फर्निचर खराब झालेले आहेत तरी प्राथमिक शाळांमध्ये मुलांच्या व शिक्षकांच्या दैनंदिनी कामासाठी लागणाऱ्या फर्निचरची खालीलप्रमाणे खरेदी करण्यास मान्यता देणेत येत आहे. लोखंडी कपाट मोठे, लोखंडी कपाट लहान, ग्रंथालय बुक केस, लोखंडी रॅक,

रिव्हाल्वीगा चेअर एफ सी ९०९ संगणक,पी.व्ही.सी खुर्ची, एस.टाईप खुर्ची, लोखंडी लॉकर्स, व्हिजिटर्स ३ सिटर खुर्ची, डस्टबीन, मोठे टेबल , लहान टेबल खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्या झाला

---------

ठराव क्रमांक - ०५ विषय क्रमांक - ०२
दिनांक - २०/१२/२०२१ विभाग - शिक्षण
सुचक - मा.मनिषा पवार अनुमोदक - मा.सारीका सस्ते
संदर्भ - मा. मनिषा पवार व मा. सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व माध्यमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा शासन निर्णयानुसार सुरु होत असताना शाळेतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इ. १ ली ते इ. १० वी तील विद्यार्थांना नकाशावही, व्यवसायमाला व प्रयोगवही खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्या झाला

----------

ठराव क्रमांक - ०६ विषय क्रमांक - ०३
दिनांक - २०/१२/२०२१ विभाग - शिक्षण
सुचक - मा.मनिषा पवार अनुमोदक - मा.सारीका सस्ते
संदर्भ - मा. मनिषा पवार व मा. सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने महानगरपालिकेतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ. ५ वी आणि इ. ८ वी तील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेस बसत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ. ५ वी एकूण ५६९२ ( मराठी- ४५१०, उर्दू-६१९, हिंदी-१२५, इंग्रजी -४३८) आणि इ. ८ वी तील एकूण १८५७ ( मराठी- १३८५ , उर्दू-२७९, हिंदी-१०९, इंग्रजी -८४ ) विद्यार्थांना महाराष्ट्र शासनाच्या बालभारती मार्फत “शिष्यवृत्ती

मार्गदर्शिका" पुस्तके मूळ किमतीच्या १५% सवलतीत खरेदी करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( राजापुरे माधवी राजेंद्र )
**सभापती**
मा.शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५६१/२०२१
दिनांक - २१/१२/२०२१



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.